# मनोरुग्णांसाठी अहोरात्र चालणारे उपदेशन केंद्र

मुंबई, दि. १९ (प्रतिनिधी) - आधुनिकता, औद्योगिकीकरण, यांत्रिकीकरणाच्या युगात वाढलेल्या जीवघेण्या स्पर्धा मानसिक रुग्णांचे प्रमाण वाढत असल्याने अशा मनोरुग्णांचे समुपदेशन करण्यासाठी वांद्रेवाला फाऊंडेशनतर्फे पवई येथील हिरानंदानी रुग्णालयात चोवीस तास चालणारे समुपदेशन केंद्र सुरू करण्यात आले आहे.

मानसिक रुग्णांच्या समस्या सोडवण्यासाठी वांद्रेवाला फाऊंडेशनच्यावतीने ऑगस्ट २००९ मध्ये २५७०६००० ही मानसिक आरोग्य हेल्पलाइन सुरू करण्यात आली होती. या हेल्पलाइनवर संपर्क साधणाऱ्या रुग्णांचे मानसिक आरोग्य प्रचंड तणावामुळे बिघडल्याचे निदर्शनास आले. अशा रुग्णांना अधिक योग्यप्रकारे तसेच काळजीपूर्वक हाताळण्यासाठी वांद्रेवाला फाऊंडेशनच्यावतीने पुढचे पाऊल म्हणून थेट समुपदेशन केंद्र सुरू करण्यात आल्याचे वांद्रेवाला फाऊंडेशनचे उपाध्यक्ष डॉ. जॉन यांनी सांगितले. तात्काळ सेवेसाठी ही हेल्पलाइन रुग्णवाहिका तसेच पोलीस विभागाशी जोडली गेली आहे. येत्या काळात पुणे, नागपूर, नाशिक या भागातही समुपदेशन केंद्रांची स्थापना करून राज्यभरात तसेच शहरातही समुपदेशन केंद्रे वाढवण्याची योजना असल्याचेही त्यांनी या वेळी सांगितले.

हेल्पलाइनची त्रिस्तरीय प्रक्रिया आहे. त्यात प्रथम रुग्णालयातील मनोवैज्ञानिक हेल्पलाईनवरून संबंधित व्यक्तीची मानसिक स्थिती तसेच मनाची गुंतागुंत समजून घेतात. दुसऱ्या टप्पत प्रशिक्षित मानसशास्त्रज्ञ संबंधिताचे समुपदेशन करतात. जर ती व्यक्ती त्यातून सावरण्याच्या स्थितीत नसेल अथवा आत्महत्येस प्रवृत्त झाली असेल तर तात्काळ वरिष्ठ मानसोपचार तज्ज्ञांद्वारे त्याच्या मानसिक समस्येचे निराकरण करण्यासाठी पाठवले जाणार आहे.